# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२१६५९४, २२३१०४ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com


जा.क्र./महा. वि./गो.वि./२४६/२०१५ दिनांक २६/२/२०१५

प्रती,

मा.अध्यक्ष/सचिव/प्राचार्य
गोंडवाना विद्यापीठ
संलग्नित सर्व महाविद्यालये जि.चंद्रपुर व गडचिरोली

विषयः— जेष्ठ कवी वि.वा शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी २०१५ हा जन्मदिवस ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणुन साजरा करणेबाबत..

संदर्भः— १. उशिसं/प्रशा ३/भाषा/२०१४—१५/ १८७१ दि. २५/२/२०१५

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत येत असलेल्या सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, जेष्ठ कवी वि.वा शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी २०१५ हा जन्मदिवस ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणुन साजरा करण्यात यावा.

सहपत्र
१. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक संलग्न

संचालक (प्रभारी)
महाविद्यालयीन व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**ज्येष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस, "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
मराठी भाषा विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:मभादि-२०१५/प्र.क्र.१८/२०१५/भाषा-३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : २५ फेब्रुवारी, २०१५.**

वाचा : मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.मभादि-२०१२/प्र.क्र.८८/२०१२/भाषा-३, दिनांक २१ जानेवारी, २०१३.

## परिपत्रक

श्री.वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेबद्दल गौरव म्हणून आणि त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून श्री.वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन दिनांक २७ फेब्रुवारी हा दिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याच्या सूचना यापूर्वी दिनांक २१ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयास अनुसरुन राज्यातील सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी दिनांक २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा व साहित्य विषयक खालील विविध उपक्रम आयोजित करुन समारंभपूर्वक मराठी भाषा गौरव दिन सोहळा साजरा करण्याबाबत पुन्हा सूचित करण्यात येत आहे.

(१) सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने राज्यभर ग्रंथप्रदर्शन / ग्रंथोत्सव / ग्रंथदिंडी आयोजित करणे.

(२) शाळा / महाविद्यालय / शासकीय व निमशासकीय कार्यालये / खाजगी संस्थांमध्ये विविध स्तरावर स्पर्धा आयोजित करणे.

(३) मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शासनाच्या विविध उपक्रमांना प्रसिध्दी देणे.

(४) आकाशवाणी व दूरदर्शनवरुन सादर करण्यात येत असलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या प्रायोजित कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या मुलाखती, परिसंवाद आयोजित करणे.

कृ.मा.प.

(५) राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती विषयक स्पर्धा (निबंध, वक्तृत्व इ.) आयोजित करणे.

२. सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपआपल्या विभागातील कार्यक्षेत्रातील संबंधितांचे सहकार्य घेऊन हा सोहळा पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सहभागी करुन घ्यावे.

३. सदर उपक्रमांकरीता होणारा खर्च, प्रत्येक वित्तीय वर्षात संबंधित लेखाशिर्षाखाली कार्यालयीन खर्चासाठी मंजूर होणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Gawde Aparna A.

( अपर्णा अ.गावडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा.मंत्री यांचे स्वीय सहायक,
४. सर्व मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (दूरदर्शन / आकाशवाणी / वृत्तपत्रे / भित्तीपत्रके या माध्यमातून विस्तृत प्रसिध्दी देण्यासाठी)
९. सर्व मंत्रालयीन विभाग (त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना सूचना देण्याबाबत)
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१३. भाषा संचालक, भाषा संचालनालय, बांद्रा, मुंबई,
१४. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
१५. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
१६. संचालक / प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
१७. मराठी भाषा विभाग / सर्व कार्यासने,
१८. निवड नस्ती (भाषा-३).